ठाणे, शुक्रवार दि. २ ऑगस्ट २०२४ वर्ष : १३, अंक : ९५ पाने : ४, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

वर्धापनदिन
१३ वर्षांची यशस्वी घोडदौड

दैनिक महाराष्ट्र सम्राट
सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच ! ®
मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर आणि पुणे येथून प्रसिद्ध
संपादक : चंद्रकांत भोईटे

अग्रलेख
**भोपाळ दुर्घटनेतील कचऱ्याचा प्रश्न**
भोपाळ गॅस दुर्घटनेला जवळपास ४० वर्षे झाली आहेत. त्यावेळी सुमारे ५ हजार लोकांचा या दुर्घटनेत मृत्यू झाला होता. नंतरच्या पिढ्यांमध्ये अपंगत्व, व्यानंतव निर्माण झाले.
......पान २ वर


कल्याण नगर मार्गावरील शहाड पूलाला भगदाड
...पान ४ वर

■ कोल्हापूरच्या पठ्ठ्यानं इतिहास घडवला

# नेमबाज स्वप्निल कुसाळेनं पटकावलं ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक

मुंबई – स्वप्नील कुसाळे हा महाराष्ट्रातील कोल्हापूर येथील कांबळवाडी गावातील असून तो २०१२ पासून आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करत आहे. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये महाराष्ट्राचा नेमबाज स्वप्नील कुसाळेने ५० मीटर रायफल थ्री पोझिशनच्या प्रकारात कांस्य पदक पटकावलं आहे. या स्पर्धेत स्वप्नीलने एकुण ४५१.४ गुण प्राप्त केले. चीनचा लिऊ युकुनने सुवर्णपदक जिंकलं. त्याचे गुण ४६३.६ होते. तर युक्रेनच्या कुलिस सेरहीने रौप्य पदक पटकावलं. भारताचं पॅरिस ऑलिम्पिकमधील हे तिसरं कांस्य पदक आहे. स्वप्नील कुसाळे हा **(पान २ वर)**

### स्वप्नीलने इतिहास रचला

भारताच्या स्वप्नील कुसळेने इतिहास रचला आहे. पुरुषांच्या ५० मीटर रायफल थ्री पोझिशन नेमबाजीत स्वप्नीलने कांस्यपदक जिंकले. ऑलिम्पिकमधील ५० मीटर रायफल थ्री पोझिशन स्पर्धेत भारतीय नेमबाजाने प्रथमच पदक जिंकले आहे. सध्या सुरु असलेल्या ऑलिम्पिक स्पर्धेतील भारताचे हे तिसरे पदक आहे. स्वप्नीलने एकूण ४५१.४ गुण मिळवले.

■ खाशाबा जाधवांनंतर महाराष्ट्रात आलं ऑलिम्पिक पदक



### ■ मध्य रेल्वेने स्वप्नीलसाठी पेटारा उघडला; ऑफिसर म्हणून प्रमोशन देणार

स्वप्निल कुसाळे यांनी इतिहास रचलेला आहे. बहात्तर वर्षानंतर एका मराठी मुलाला ऑलिंपिकमध्ये पदक मिळालेले आहे मात्र हा स्वप्निल सध्या मध्य रेल्वेच्या पुणे डिव्हिजन मध्ये टीसी म्हणून काम करतोय. यामुळेच मध्य रेल्वेसाठी ही गर्वाची गोष्ट आहे. ज्यावेळेस स्वप्निल हा पॅरिस हून भारतात येईल त्यावेळेस भारतीय रेल्वेकडून त्याचा यथोचित सन्मान केला जाईल आणि ताबडतोब त्याला ऑफिसर म्हणून प्रमोशन देण्यात येणार आहे, अशी घोषणा मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक राम करण यादव यांनी केली. त्याचप्रमाणे रेल्वेमंत्री स्वप्नीलसाठी रोख बक्षीस देखील जाहीर करणार आहेत, त्यामुळे आता स्वप्निल हा मध्य रेल्वेचा एक ऑफिसर म्हणून यापुढे काम करेल, असे मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक राम करण यादव यांनी जाहीर केले आहे. तसेच मध्य रेल्वेची अंकिता ध्यानी ही देखील ऑलम्पिकसाठी पॅरिसला गेली असल्याने तिला देखील राम करण यादव यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

### कोल्हापूरच्या पठ्ठ्यासाठी पंतप्रधान मोदींची खास पोस्ट

पंतप्रधान मोदी आपल्या ट्वीटमध्ये म्हणाले, स्वप्नील कुसाळेची अद्वितीय कामगिरी! पॅरिस ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक जिंकल्याबद्दल तुझे अभिनंदन... ५० मीटर रायफल शुटींमध्ये कांस्य पदक पटकावलं आहे. तू मिळवलेल्या यशानंतर आज प्रत्येक भारतीयाचा ऊर अभिमानाने भरून आला आहे

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून नेमबाज स्वप्नील कुसाळेचे अभिनंदन

स्वप्नीलमुळे कुस्तीमध्ये भारतासाठी वैयक्तिक असे पहिले पदक पटकावणाऱ्या खाशाबा जाधव यांचे स्मरण झाले. तब्बल ७२ वर्षांनी स्वप्नीलने महाराष्ट्रासाठी या पदकाचा वेध घेऊन, तशाच पद्धतीचा आनंद आणि उत्साह राज्यातील क्रीडा क्षेत्रासाठी निर्माण केला आहे. कांबळवाडी सारख्या ग्रामीण भागातून येऊन स्वप्नीलने आपले राज्य आणि देशाचे नाव आंतरराष्ट्रीयस्तरावर झळकवले आहे. देशासाठी वैयक्तिक पदकाची कमाई करताना, स्वप्नीलने महाराष्ट्राचा क्रीडा क्षेत्रातील गौरव वाढवला आहे.



## मुंबई पोलिसांच्या ताफ्यात घोडदळ

■ ३० तरणेबांड, सुदृढ घोडे खरेदी करणार, कोटींचा निधी मंजूर

■ आता लवकरच मुंबईतील समुद्र किनारे; तसेच गरज पडल्यास गर्दीच्या ठिकाणी मुंबई पोलिस घोड्यांवरून गस्त घालताना दिसतील.

मुंबई : मुंबई पोलिस आता ठिकठिकाणी घोड्यावरून गस्त घालताना दिसणार आहेत. यासाठी राज्य सरकारने पोलिसांना ३६ कोटी रुपयांच्या निधीचे बळ दिले आहे. पोलिसांसाठी तीस तरणेबांड, सुदृढ घोडे खरेदी केले जाणार आहेत. सर्व सुविधांनी युक्त असा तबेला उभारण्यात येत असून, पोलिसांना घोडेस्वारीच्या प्रशिक्षणाबरोबरच घोड्यांचा आहार, निगा राखण्याचे धडे दिले जात आहेत. सरकारने निधीचे बळ दिल्याने मुंबई पोलिस दलात लवकरच 'माऊंटेड पोलिस युनिट' (अश्व दल) नव्याने सुरू होणार आहे. **(पान २ वर)**

मुंबईत जितेंद्र आव्हाड यांच्या गाडीवर हल्ला

# ठाण्यात आणि मुंब्र्यात उमटले पडसाद...केला रास्तारोको

मुंबईत स्वराज्य पक्षाचे प्रमुख संभाजी राजे याच्या विरोधात केलेल्या विधानांमुळे गुरुवारी मुंबई राष्ट्रवादीचे आ. डॉ. जितेंद्र आव्हाड यांच्या गाडीवर स्वराज्य पक्षाच्या हल्लेखोर कार्यकर्त्यांनी हल्ला केला. डॉ. जितेंद्र आव्हाड हे बचावले मात्र त्यांची गाडी फोडण्यात आली. सदर घटनेच्या नंतर अवघ्या काही मिनिटातच मुंब्रा आणि ठाण्यात त्याचे पडसाद उमटले. राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी आणि डॉ. जितेंद्र आव्हाड समर्थकांनी मुंब्रा परिसरात रास्ता रोको करून महायुतीच्या सरकारच्या विरोधात घोषणाबाजी केली. अचानक मुंब्र्यात रास्ता रोको केल्याने वाहतुकीचा चक्काजाम झाला. तर मुंब्रा आणि ठाण्यात पोलिसांनी राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांना ताब्यात घेण्याची कारवाई केली. तर या भ्याड हल्ल्याचे पडसाद महामार्गावर रास्तारोको करीत सुहास देसाई आणि शानू पठाण, मर्जीया पठाण आणि राष्ट्रवादी कार्यकर्ते यांनी निषेध नोंदविला. (पान २ वर)

■ **स्वराज्य पक्षाचे हल्लेखोर... सरचिटणीसानी दिली काबुली....**







(छाया : मनोज सिंह)

### हल्ल्यानंतर जितेंद्र आव्हाड काय म्हणाले?

या हल्ल्यानंतर माध्यमांना प्रतिक्रिया देताना आव्हाड म्हणाले, तीन जणांनी आज माझ्या गाडीवर हल्ला केला. माझ्याकडे चार पोलीस होते, पण मी त्या तरुणांवर कोणताही हल्ला करण्यास सांगितले नाही. मी आशा भ्याड हल्ल्यांना घाबरणार नाही. मी विशाळगडाबाबत बोललो कारण छत्रपती शाहू महाराजांनी समतेचा जो वारसा दिला आहे, तो संभाजीराजेंनी पुढे न्यायला पाहीजे होता. पण त्यांनी केवळ बोलघेवडेपणा केला. माझ्या गाडीवर हल्ला करून मी शांत बसेन असे तुम्हाला वाटत असेल पण तसे होणार नाही मी आणखी त्वेषाने तुमच्याविरोधात बोलणार आहे. आतापर्यंत तुम्हाला आदरार्थी बोलत होतो, पण आता मी बोलण्यासाठी मोकळा आहे.

### संभाजीराजेंवर काय टीका केली होती?

विशाळगडावरील अतिक्रमण हटविण्यासाठी माजी खासदार संभाजीराजे छत्रपती यांनी आक्रमक भूमिका घेतली होती. त्यांच्याकडून विशाळगड येथे आंदोलनही करण्यात आले. मात्र या आंदोलनाच्या निमित्ताने विशाळगडावर काही समाजकंटकांनी तोडफोड केली. यानंतर संभाजीराजेंवर टीका करत असताना जितेंद्र आव्हाड म्हणाले, संभाजीराजेंना आता छत्रपती म्हणणे सोडून द्या. कारण त्यांना वंशपरंपरागत जो अधिकार मिळाला होता, तो पुढे घेऊन जाण्याची त्यांची जबाबदारी होती. शाहू महाराज आणि संभाजीराजेंच्या रक्तात काय आहे? हे तपासण्याची गरज आहे. शाहू महाराजांच्या घराण्यातला माणूस असे विधान करतो की, ज्यामुळे दंगल उसळते, तो शाहू महाराजांच्या घरातील असूच शकत नाही. त्यामुळे त्यांना छत्रपती कुणी म्हणावे, याचा विचार झाला पाहीजे. ज्यांच्याकडे कर्तुत्व आहे, त्यांना छत्रपती म्हणावे. आताचे शाहू महाराज यांना मी नक्कीच छत्रपती म्हणेण. कारण त्यांनी नुकसानग्रस्त भागाची पाहणी करून लोकांची माफी मागितली. जे राजेघराण्यातील लोकांनी करायला पाहीजे, ते शाहू महाराजांनी केले होते, असेही जितेंद्र आव्हाड म्हणाले.



माजी खासदार राजन विचारे यांनी वाढदिवस न साजरा करता ठाणे, टेम्बी नाका येथील धर्मवीर आनंद दिघे यांचा दर्शन घेतले तयनानंतर शक्ती स्थळ येथे पुष्पहार अर्पण केले. (छाया , मनोज सिंह)

# अनुसूचित जाती आणि जमातींच्या आरक्षणामध्ये वर्गवारी करण्याला सुप्रीम कोर्टाची मंजुरी

**मुंबई –सर्वोच्च न्यायालयाने राज्यांना एससी आणि एसटी प्रवर्गात वर्गवारी करून आरक्षणाचा प्राधान्यक्रम ठरवण्याचा अधिकार देताना म्हटले की, केंद्रापेक्षा राज्यांकडूनच एससी आणि एसटी प्रवर्गातील वर्गवारी अधिक चांगल्या पद्धतीने होऊ शकते.**

नवी दिल्ली: सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी झालेल्या सुनावणीदरम्यान अनुसूचित जाती (डउ) आणि अनुसूचित जमातींबाबत (एसटी) एक महत्त्वपूर्ण आणि दूरगामी परिणाम करणारा निकाल दिला. त्यानुसार आता प्रत्येक राज्याला अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींमध्ये वर्गवारी करुन आरक्षणाचा प्राधान्यक्रम ठरवण्याचा अधिकार मिळाला आहे. यापूर्वी २००४ साली सर्वोच्च न्यायालयानेच राज्यांना एससी आणि एनटी प्रवर्गात वर्गवारी करण्याचा अधिकार देता येणार नाही, असा निकाल दिला होता. मात्र, गुरुवारी झालेल्या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयातील सात न्यायमूर्तींच्या खंडपीठाने सहा विरुद्ध एक अशा मताधिक्याने राज्यांना एससी आणि एसटी प्रवर्गात वर्गवारी **(पान २ वर)**

### एससी आणि एसटीला क्रिमीलेअरचे निकष लागू होणार?

आतापर्यंत ओबीसी आरक्षणाचा लाभ घेणाऱ्यांना क्रिमीलेअरचे निकष लागू होते. त्यानुसार ठराविक मर्यादेपेक्षा जास्त उत्पन्न असणाऱ्यांना ओबीसी प्रवर्गातील लोकांना आरक्षणाचा लाभ मिळत नव्हता. आता हेच निकष एससी आणि एसटी प्रवर्गासाठीही लागू होणार आहेत. त्यामुळे एससी आणि एसटीमध्येही क्रिमीलेअर आणि नॉन-क्रीमिलेअर अशी वर्गवारी होईल. त्यामुळे एससी आणि एसटीमध्ये प्रवर्गातही क्रिमीलेअर वर्गात मोडणाऱ्यांना आरक्षणाचे सर्व लाभ मिळणार नाहीत.



### काय आहे सुप्रीम कोर्टाचा निर्णय ?

- अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या आरक्षणात वर्गवारी करता येते . अनुसूचित जाती, जमातीतील उपवर्गीकरणाला सुप्रीम कोर्टाची मान्यता. सुप्रीम कोर्टाने ६ विरूद्ध १ अशा बहुमताने दिला निकाल
- इंपेरिकल डेटा गोळा करुन सरकारला जातीबाबत झालेला भेदभाव दूर करता येईल
- सरकारी नोकरी आणि शैक्षणिक प्रवेशांसाठी वर्गवारी करता येईल
- न्यायमूर्तींच्या घटनापीठाचा ६ विरुद्ध १ असा बहुमताने निर्णय
- न्या.बेला त्रिवेदी मात्र वर्गवारीविरोधात. वर्गवारी योग्य ठरवणाऱ्या सहा न्यायमूर्तींचे पाच स्वतंत्र मतं देणारे निकाल



# संपादकीय...



संपादक–चंद्रकांत भोईटे

## भोपाळ दुर्घटनेतील कचऱ्याचा प्रश्न

भोपाळ गॅस दुर्घटनेला जवळपास ४० वर्षे झाली आहेत. त्यावेळी सुमारे ५ हजार लोकांचा या दुर्घटनेत मृत्यू झाला होता. नंतरच्या पिढयांमध्ये अपंगत्व, व्यानंतव निर्माण झाले. जगाच्या औद्योगिक इतिहासातील ही सर्वात मोठी दुर्घटना होती. आता मध्य प्रदेश राज्य सरकारने ४० वर्षानंतर युनियन कार्बाइड मधील ३३७ मेट्रिक टन घातक कचरा जाळण्याचे ठरवले आहे. त्यासाठी केंद्र सरकार राज्याला १२६ कोटी रुपये देणार आहे. या दुर्घटनेतील कचर्याची विल्हेवाट लावण्याचा निर्णय घेण्यास ४० वर्षांइतका दीर्घ कालावधी का लागला? अशी चर्चा होती. मध्य प्रदेशमधील भोपाळ येथे दि. २ डिसेंबर १९८४ मध्ये शहराच्या सीमेवर असलेल्या युनियन कार्बाइड इंडिया लिमिटेडच्या (यूसीआयएल) मालकीच्या युनियन कार्बाइड प्लांटमधून अत्यंत विषारी अशा मिथाइल आयसोसायनेट (एमआयसी) वायूची गळती झाली आणि पाच हजार लोकांचा मृत्यू झाला. या दुर्घटनेतून वाचलेल्यांना त्वचेचे आजार झाले आणि त्यानंतर भोपाळमधील जन्मलेल्या अनेक बालकांमध्ये व्यंगत्व असल्याचे लक्षात आले. या भागात पर्यावरणीय प्रदूषण प्रचंड प्रमाणात वाढले. कारखान्याच्या आजूबाजूचे पाण्याचे स्रोत दूषित झाले आणि अनेक हातपंपही सील करण्यात आले. अमेरिकेतील युनियन कार्बाइड कॉर्पोरेशन (यूसीसी)ची उपकंपनी यूसीआयएल डाऊ केमिकल्सचा एक भाग आहे. या कंपनीकडून न्याय्य नुकसानभरपाईची मागणी सातत्याने केली जात आहे. सर्वोच्च न्यायालयाने २०२३ मध्ये यूसीसीच्या उत्तराधिकारी कंपन्यांकडून अतिरिक्त नुकसानभरपाईची मागणी करणारी केंद्र सरकारची याचिका फेटाळली होती. या ठिकाणच्या प्रदूषणासाठी डाऊ केमिकल्सला जबाबदार धरणारी आणि दूषित परिसर त्वरित स्वच्छ करण्याची मागणी करण्यासाठी कार्यकर्ते आलोक प्रताप सिंग यांनी २००४ मध्ये मध्य प्रदेश उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली होती. न्यायालयाने भारत सरकारच्या रसायन आणि पेट्रोकेमिकल्स विभागाच्या सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक टास्क फोर्स स्थापन केली. २००५ मध्ये केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ (सीपीसीबी) तज्ज्ञांनी कचऱ्याची सुरक्षित विल्हेवाट लावण्यासाठी गुजरातमधील अंकलेश्वर येथे हा कचरा जाळण्याचा आदेश दिला. परंतु, २००७ साली गुजरातमध्ये या निर्णयाविरोधात निदर्शने झाली आणि २००९ मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या हस्तक्षेपानंतर हा निर्णय मागे घेण्यात आला. कचऱ्याच्या विल्हेवाटासाठी टास्क फोर्सने हैदराबादमधील डुंगीगल आणि मुंबईतील तळोजा या दोन्ही टीडीएसएफ म्हणजेच ट्रीटमेंट, स्टोरेज अ‍ॅण्ड डिस्पोजल फॅसिलिटी साइट्स असल्याचे सुचवले. अखेर २०१० मध्ये सर्वोच्च न्यायालयाने यशस्वी चाचणीनंतर मध्य प्रदेशातील पिथमपूर येथील एका टीडीएसएफ साईटमध्ये ३४६ टन कचरा जाळण्याचा आदेश दिला. या निर्णयाला दोन वर्षांनंतर राज्याने आव्हान दिले आणि २०१२ मध्ये सर्वोच्च न्यायालयात विशेष रजा याचिका दाखल केली. राज्याने असा युक्तिवाद केला की, भोपाळ गॅस दुर्घटनेतील घातक कचरा जाळण्यासाठी ही सुविधा तांत्रिकदृष्ट्या योग्य नाही आणि ती औद्योगिक कचऱ्याच्या तुलनेत अधिक धोकादायक आहे. जर्मनीतील जीआयझेड–आयएस या कंपनीने जर्मनीत कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी २४.५६ कोटी खर्चाचा प्रस्ताव सादर केला होता. परंतु, त्यांच्या नागरिकांच्या मोठ्या विरोधानंतर २०१२ मध्ये तोही मागे घेण्यात आला. २०१५ मध्ये केंद्राने पिथमपूरच्या टीडीएसएफ साईटवर चाचणी सुरू केली; परंतु रहिवाशांच्या विरोधामुळे पुढील योजना स्थगित कराव्या लागल्या. केंद्र आणि राज्य यांच्यात एकमत न झाल्याने याविषयावर सात वर्षे कोणतीही कारवाई झाली नाही. अखेर ४ मार्च २०२४ रोजी केंद्र सरकारने न्यायालयाच्या मोठ्या मागणीनंतर कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी १२६ कोटी रुपये मंजूर केले. प्रस्तावानुसार मध्य प्रदेश भोपाळ गॅस ट्रॅजेडी रिलीफ अ‍ॅण्ड रिहॅबिलिटेशन (बीजीटीआरआर) जुलै– ऑगस्ट दरम्यान इंदूर येथील पिथमपूरच्या टीडीएसएफमध्ये घातक कचर्याची विल्हेवाट लावण्याचे काम सुरू करण्याचे ठरले आहे. हा प्रकल्प ६ महिन्यांत पूर्ण होणे अपेक्षित आहे. पहिल्या २० दिवसांत कचरा दूषित जागेवरून पॅकबंद ड्रममध्ये विल्हेवाटीच्या ठिकाणी नेला जाईल. त्यानंतर हा कचरा ब्लेंडिंग शेडमध्ये हलविला जाईल; जिथे तो रीजेंटमध्ये मिसळला जाईल आणि नंतर तीन ते नऊ किलो वजनाच्या लहान पिशव्यांमध्ये पॅक केला जाईल. हवेची गुणवत्ता बिघडणार नाही याची खात्री करण्यासाठी आणि जाळण्याची प्रक्रिया मानक कार्यपद्धतीनुसार व्हावी, हे सुनिश्चित करण्यासाठी कचर्याची विल्हेवाट सुरू होण्यापूर्वी अनेक विभागांना मान्यतेसाठी अहवाल पाठवले जातील. या संपूर्ण प्रक्रियेसाठी तब्बल १२६ कोटींचा खर्च येणार आहे. बीजीटीआरआरच्या २०१० च्या अहवालात युनियन कार्बाइडच्या आवारातील नऊ जागा दूषित असल्याचे सांगण्यात आले आहे. घटनास्थळी ३,२०,००० क्यूबिक मीटर माती सुधारणे आवश्यक आहे. परिसरातील भूजल साठाही दूषित आहे. क्षेत्राजवळील पाच विहिरींमध्ये घातक रसायन आढळून आले आहे. २०२१ च्या राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाच्या (एनजीटी) अहवालात कारखान्याच्या उत्तरेस असलेले सौर बाष्पीभवन तळे स्वच्छ करण्याचे निर्देश देण्यात आले. या तळ्यात मँगनीज आणि निकेलसारख्या जड धातूंचे कण, तसेच क्लोरिनसारखे रसायन आढळून आले. २०१५ च्या एका चाचणी अहवालात म्हटले आहे की, कचर्यातून कोणत्याही रसायनाचे उत्सर्जन झाले नाही. ज्या जागेवर चाचणी करण्यात आली, त्याच्या सभोवतालच्या हवेची गुणवत्ता वायू गुणवत्ता मानकांमध्ये होती. कचर्याची चाचणी करण्यात आली, त्या आवारातील नमुने वगळता सभोवतालच्या हवेत निकेलचे प्रमाण न आढळल्याचे अहवालात सांगण्यात आले आहे. परंतु, गॅस दुर्घटनेतील पीडितांच्या पुनर्वसनासाठी काम करणाऱ्या सामाजिक गटांनी हे दावे फेटाळून लावले आहेत. २०२२ च्या सीपीसीबी अहवालात असे दिसून आले आहे की, सातपैकी सहा चाचण्यांदरम्यान या भागातील रहिवासी डायऑक्सिन्स आणि फुरान्सच्या संपर्कात आले होते. रसायन जाळण्यात आल्यानंतर अशी रासायनिक प्रदूषके तयार होतात; ज्यामुळे त्वचेचे विकार, यकृताचे विकार, रोगप्रतिकार प्रणाली बिघडणे यांसारख्या समस्या उद्भवतात. एकूण भोपाळ दुर्घटनेतील घातक कचऱ्याची विल्हेवाट करण्याची प्रक्रिया सोपी नाही हे निश्चित !


**जाहिरातीसाठी एकमेव दै. 'महाराष्ट्र सम्राट'**

- ☆ मिळकत नोटीस
- ☆ हस्तांतर करार नोटीस
- ☆ नोंदणी न्यास नोटीस
- ☆ निविदा जाहिरातीसाठी
- ☆ तहसिल जाहीरनामा
- ☆ कामगार न्यायालय नोटीस
- दिलेल्या जाहिरात त्वरित प्रसिद्ध करणेसाठी एकमेव दैनिक महाराष्ट्र सम्राट
- शुभेच्छा / वाढदिवस जाहिरातीसाठी महाराष्ट्रातील प्रभावी दैनिकांपैकी एक म्हणजे महाराष्ट्र सम्राट

संपर्क : दै. महाराष्ट्र सम्राट, विक्रीकर कार्यालय शेजारी, गेट नं. ४, कलेक्टर कंपाऊंड, कोर्टनाका, ठाणे (प.) ४००६०१
☎ 022 - 25379944 , +91 - 9167957771



* पीआरबी कायद्यानुसार सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीनकक्षेच्या आधीन राहिल. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या / लेख / जाहिराती यांची जबाबदारी संबंधित वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यात राहिल.)



महाराष्ट्र सम्राट
*DISCLAIMER: Readers are requested to verify and make appropriate enquires to satisfy themselves about the veracity of an advertisement before responding to any published in this newspaper. The publisher & the owner of this newspaper, does not vouch for the authenticity of any advertiser's products and/ or services. In no event can the Owner, Publisher, Printer, Editor, Director's, Employees of this newspaper/ company be held responsible/liable in any manner whatsoever for any claims and/or damages for advertisments in the newspaper.


## नेमबाज स्वप्निल कुसाळेनं पटकावलं ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक

**(पान १ वरून)** महाराष्ट्रातील कोल्हापूर येथील कांबळवाडी गावातील असून तो २०१२ पासून आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करत आहे. आता १२ वर्षांच्या प्रदीर्घ प्रतिक्षेनंतर स्वप्नील कुसाळेने ऑलिम्पिकमध्ये पदार्पण केले आहे.

भारताच्या स्वप्नील कुसाळेनं ५० मीटर रायफल शुटींमध्ये कांस्य पदक पटकावलं. ४५१.४ गुणांची कमाई करत स्वप्नीलने कांस्य पदकावर नाव कोरलं. विशेष म्हणजे खाशाबा जाधवांनी हेलसिंकी ऑलिम्पिकमध्ये जिंकलेल्या कांस्य पदकानंतर महाराष्ट्राच्या सुपुत्राने जिंकलेलं हे वैयक्तिक पदक आहे. पदकासाठी अंतिम सामना हा तीन फेऱ्यांत झाला.. निलींग पोझिशन, प्रोन पोझिशन, स्टँडिंग पोझिशन अशा तीनही फेऱ्यांनंतर एलिमिनेशन राऊंड खेळली जाते. निलींग पोझिशनमध्ये स्वप्नीलने १५३.३ गुणांची कमाई केली. प्रोन पोझिशनमध्ये १५६.८ गुणांची कमाई केली. तर स्टँडिंग पोझिशनमध्ये त्याने १०१.५ गुणांची कमाई केली. एलिमिनेशन राऊंडमध्ये स्वप्नीलने १०.५, ९.४, ९.९ आणि १० गुणांची कमाई केली. १० गुणांची कमाई केली. या लक्ष्यवेधी नेमबाजीने स्वप्नीलने भारताच्या गळ्यात कांस्य पदकाची कमाई करून दिली.

## मुंबईत जितेंद्र आव्हाड यांच्या गाडीवर हल्ला

**(पान १ वरून)** आ. आव्हाड यांच्या गाडीवर झालेल्या भ्याड हल्ल्याचा निषेध मुंब्रावासीयांनी रस्त्यावर उतरून ठिय्या मांडत नोंदविला. भाजप हाय..... हाय, जितेंद्र आव्हाड तुम संघर्ष करो....हम तुम्हारे साथ है अशा घोषणाबाजी करीत मुंब्र्यातील माजी नगरसेवक आणि कट्टर समर्थक अशरफ उर्फ शानु पठाण, मर्जिया पठाण आणि असंख्य राष्ट्रवादी कार्यकर्त्यांनी हल्लेखोरांना लोकशाहीच्या मार्गाने रास्ता रोको करून चोख प्रतिउत्तर दिले. ठाण्यात राष्ट्रवादीचे पदाधिकारी आणि कट्टर आव्हाड समर्थक सुहास देसाई यांनी विवियाना मॉल समोर महामार्ग अडवून रास्तारोको केला. मुंब्रा आणि ठाण्यात अचानकच्या रास्ता रोकोने वाहतुकीचा एकच चक्काजाम झाला. मुंब्रा परिसरात ठाणे पालिकेचे माजी विरोधी पक्षनेते शानू पठाण आणि मर्जिया पठाण यांनी केला रास्तारोको करीत राज्य सरकार आणि भाजप विरोधात घोषणाबाजी करीत आव्हाड साहेब, तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ है चा प्रतिसाद दिला. डॉ. जितेंद्र आव्हाड यांच्या समर्थकांनी मुंब्रा परीसरात रास्ता रोको केल्यानंतर याचे पडसाद ठाणे शहर परिसरातही उमटले. ठाण्यातील आव्हाड कट्टर समर्थक सुहास देसाई यांनी ठाण्यात विवियाना मॉलसमोर रास्ता रोको करून महामार्गच अडविला आणि सरकारच्या विरोधात घोषणाबाजी करत आव्हाड साहेब तुम्ही संघर्ष करा आम्ही तुमच्या सोबत आहोत असा प्रतिसाद दिला. मुंब्रा आणि ठाणे परिसरात रास्ता रोको करणाऱ्या राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यातही घेतले.

**स्वराज्य पक्षाचे हल्लेखोर... सरचिटणीसानी दिली काबुली....**

कळवा मुंब्रा मतदार संघ बालेकोट समजून आपल्यापर्यंत कोणी येऊ शकणार नाही आपल्याला कोणी काही करू शकणार नाही. अशा अंतर्भावात वावरणाऱ्या डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी स्वराज्य पक्षाचे प्रमुख संभाजी राजे यांच्या विरोधात केलेल्या वक्तव्यामुळे आणि मुस्लिमांच्या मत मिळवण्यासाठी मुंब्र्याचा पाकिस्तान बनवणाऱ्या आव्हाड यांच्यावर स्वराज्य पक्षाच्या कार्यकर्त्यांनी हा हल्ला केला. घटनास्थळावरून आव्हाड पळून गेले. मात्र कार्यकर्त्यांनी त्यांची गाडी फोडली, अशी कबुली आणि प्रतिक्रिया स्वराज्य पक्षाचे सरचिटणीस संजय जाधव यांनी सोशल मीडियाद्वारे एक व्हिडिओ प्रसारित करून दिली.

## मुंबई पोलिसांच्या ताफ्यात घोडदळ

**(पान १ वरून)** ब्रिटिश राजवटीत मुंबईत पोलिसांचे अश्व दल कार्यरत होते. ते पुन्हा सुरू करण्याचा प्रयत्न सन २०१८–२०१९मध्ये झाला. जानेवारी, २०२०मध्ये प्रत्यक्षात दलाची उभारणी होऊन १३ घोड्यांची खरेदी करण्यात आली. कमी निधीमुळे रेसकोर्समधून निवृत्त झालेले, जास्त वयाचे घोडे खरेदी करण्यात आले. मात्र, घोड्यांची खरेदी, तबेल्यासाठीच्या जागेचा प्रश्न, आहाराकडे दुर्लक्ष आणि पुरेशा निधीची वानवा यामुळे समस्या निर्माण झाली. या काळात सहा घोड्यांचा मृत्यू झाला; तर पाच घोडे नाशिक प्रशिक्षण केंद्रात पाठविण्यात आले. सध्या दोन घोडे पोलिसांकडे असले, तरी गस्तीसाठी त्याचा वापर होत नाही. गुजरात, कोलकाता, केरळ, कर्नाटक, हैदराबाद, चेन्नई पोलिसांकडेही स्वतःचे अश्व दल आहे. देशाच्या बहुतांश राज्यांतील पोलिसांकडे घोडे असून, केवळ मुंबई पोलिस त्यास अपवाद असल्याने सरकारी पातळीवर याची दखल घेण्यात आली. यामुळे आता लवकरच मुंबईतील समुद्र किनारे; तसेच गरज पडल्यास गर्दीच्या ठिकाणी मुंबई पोलिस घोड्यांवरून गस्त घालताना दिसतील.

मुंबई पोलिस दलामध्ये घोडे असावेत, अशी राजकीय इच्छाशक्ती होती; मात्र निधीअभावी अश्व दल पुन्हा सुरू करण्यात पोलिसांनी फारसा रस दाखवला नाही. हे अश्व दल चांगल्या प्रकारे आणि कायम सुरू राहावे यासाठी सुमारे ३० ते ४० कोटी रुपयांचा निधी आवश्यक असल्याचा प्रस्ताव पोलिसांनी सरकारकडे पाठवला. सरकारने ३६ कोटी ५३ लाख रुपयांचा निधी मंजूर केला.


**दररोज वाचा... दै. महाराष्ट्र सम्राट**


## अनुसूचित जाती आणि जमातींच्या आरक्षणामध्ये वर्गवारी करण्याला सुप्रीम कोर्टाची मंजुरी

**(पान १ वरून)** करण्याच्या अधिकाराला मंजुरी दिली. सर्वोच्च न्यायालयाचा हा निकाल अनेक अर्थांनी महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

सर्वोच्च न्यायालयाने राज्यांना एससी आणि एसटी प्रवर्गात वर्गवारी करून आरक्षणाचा प्राधान्यक्रम ठरवण्याचा अधिकार देताना म्हटले की, केंद्रापेक्षा राज्यांकडूनच एससी आणि एसटी प्रवर्गातील वर्गवारी अधिक चांगल्या पद्धतीने होऊ शकते. एससी आणि एसटी हे दोन्ही प्रवर्ग एक नाहीत, त्यामध्ये उपजाती, पोटजाती आहे. ते ओळखण्याचे काम राज्य सरकारची यंत्रणाच अधिक प्रभावीपणे करु शकते, असे निरीक्षण सर्वोच्च न्यायलयाच्या खंडपीठाने नोंदवले. कोटा असमानतेच्या विरोधात नाही. राज्य सरकार अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींमध्ये वर्गवारी अधिक चांगल्या पद्धतीने करु शकते, जेणेकरून मूळ आणि गरजू प्रवर्गांना आरक्षणाचे अधिक लाभ मिळतील, असेही सर्वोच्च न्यायालयाने सांगितले.


actionaid
ActionAid Association (India)

ActionAid Association
Kastur Mahal, Plot No.: 9, Wing – B, Flat No.: 15,
First Floor, Sion Station Road, Mumbai - 400022

**TENDER NOTICE**

ActionAid Association invites sealed bids from eligible bidders for supply of Computers which includes delivery charges, installation charges with all GST Amount and commissioning of Computers at Thane (TMC) location and NAVI MUMBAI location Schools. Computer Details are as under:-

| Sr. No. | Product Name | Configuration | Quantity |
|---|---|---|---|
| 1 | **HP Desktop** | Intel core i3 Processor 12th Gen<br>8 GB RAM 512 GB SSD,<br>WiFi port, Bluetooth port | 52 |
| 2 | LED - Monitor | 19.5 inches | 52 |
| 3 | Software | Windows 11 (Lifetime Licensed)<br>Single Language and MS Office 21<br>(Licensed) | 52 |
| 4 | Accessories | Keyboard and Mouse | 52 each |
| 5 | One Year Company Warranty | | 52 |
| 6 | Plus 2 Years Extended Warranty needed | | 52 |

**Eligibility of Vendors / Suppliers:**

- Supplier/Vendor must have GST registration number.
- Supplier/Vendor should not be blacklisted in records of Indian Govt.
- Any overwriting not acceptable in the tender copy.
- Supplier/Vendor should attach their necessary documents like- PAN, Bank Details & GST registration and Income Tax Return is mandatory.
- Delivery of Goods (PCs) within 7 Days of Order Placed or Confirmed

The Complete set of documents including quotation should reach us to our official address mentioned in this tender on or before **9th August 2024 by 5:00 PM** through registered post / courier / Hand Delivery.



स्वच्छ भारत — एक कदम स्वच्छता की ओर

**अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ,**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. अंनप/पाणी पुरवठा विभाग/२०२४–२५/२६५ — दि. ०१/०८/२०२४

**कोटेशन नोटीस**

अंबरनाथ नगरपरिषदेस खालील काम करावयाचे असुन, नोंदणीकृत ठेकेदार यांचेकडुन त्याबाबत सिलबंद कोटेशन्स मागविण्यात येत आहेत. ज्या कोणास सदर काम करावयाचे असेल त्यांनी सदर कामांचे दर सर्व करांसह बंद पाकीटात खाली सही करणार यांचेकडे दि.०९/०८/२०२४ रोजी सायं. ३:०० वाजे पर्यंत आणून द्यावेत. तसेच आलेली कोटेशन त्याच दिवशी किंवा प्रशासनाच्या सोयीनूसार हजर कोटेशन धारकांसमक्ष उघडण्यात येतील. कोणतेही एक कोटेशन स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार निम्न स्वाक्षरीकार यांनी राखून ठेवला आहे. तसेच खालील पैकी कोणतेही एक कागदपत्र सादर न केल्यास किंवा सादर केलेल्या कोणत्याही कागदपत्रात खरेपणा न आढळल्यास कोटेशन फेटाळण्यात येतील याची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रू. | इसारा रक्कम रू. |
|---|---|---|---|
| १ | अंबरनाथ पूर्वेकडील वॉर्ड क्र. ३३ भीमनगर येथील एस.बी.आय. बँकेच्या समोरील सार्व. शौचालयाची दुरुस्ती करणे. | ४,७५,४७१/– | ४,७५५/– |

**१) तांत्रिक बोलीचा लिफाफाक्र. ०१**
अ) पॅनकार्ड ब) ईपीएफ प्रमाणपत्र. क) कॉन्ट्रॅक्टर परवाना.
ड) जी. एस. टी. नोंदणी प्रमाणपत्र. इ) इसारा रक्कमेचा डी. डी

**२) वित्तीय बोलीचा लिफाफाक्र. ०२**
अ) मूळ प्रतितील दरपत्रक.
टिप :– सदर कोटेशन नगरपरिषदेच्या www.ambarnathcouncil.net या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
प्रत :– सुरक्षा विभाग नगरपरिषद नोटीस बोर्डावर प्रसिध्दीकरिता.

शिक्का

सही/–
(डॉ. प्रशांत रसाळ)
प्रशासक,
अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ



**नवी मुंबई महानगरपालिका**

**अभियांत्रिकी विभाग**

**निविदा सुचना क्रमांक नमुंमपा/का.अ(दिघा)./56/2024-25**

**कामाचे नाव :-** दिघा विभागातील स्मशानभुमीचे वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे.

**अंदाजपत्रकिय रक्कम रु. :- 21,14,404/-**

**निविदा पुस्तिका ई-टेंडरिंग (E-Tendering) संगणक प्रणालीच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर व www.nmmc.gov.in या संकेतस्थळावर दि.02/08/2024 रोजी प्राप्त होतील.निविदेचे सादरीकरण https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Online करण्याचे आहे. ई-निविदा ई-टेंडरिंग (E-Tendering) प्रकियेतील कोणत्याही तांत्रिक अडचणीसाठी सदर संकेतस्थळावर दिलेल्या हेल्प डेस्क नंबरवर संपर्क करावे.**

**कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार मा.आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी राखून ठेवलेला आहे**

सही/-
**कार्यकारी अभियंता (दिघा)**
**नवी मुंबई महानगरपालिका**

जाक्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/146/2024



**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

सार्वजनिक बांधकाम विभाग,
**निविदा सूचना**

ठाणे महानगरपालिका हद्दीतील **"वागळे प्रभाग समिती अंतर्गत प्र. क्र. १७ अ मध्ये शिवशक्तीनगर येथे नाल्यावर स्लॅब टाकणे"**या कामासाठी ई-निविदा मागविण्यात येत आहे. ज्या कंत्राटदारांविरुध्द शासकीय / निमशासकीय / सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम / स्थानिक स्वराज्य संस्था इ. यांनी शिस्तभंगाच्या कार्यवाहीच्या अनुषंगाने नोंदणीपत्र रद्द करण्याची कार्यवाही केली / सुरु आहे, अशा कंत्राटदारांना सदरच्या निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. कामाची सविस्तर निविदा सुचना व प्रपत्र www.mahatenders.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर दि. ०२/०८/२०२४ ते दि. ०९/०८/२०२४ सायं. १६.०० वाजेपर्यंत उपलब्धअसतील. सदर निविदा ई टेंडरींग पध्दतीने दि.०९/०८/२०२४ रोजी १६.०० पर्यंत स्विकारण्यात येतील. प्राप्त निविदा शक्य झाल्यास दि.१२/०८/२०२४ रोजी १६.०० वाजता उपस्थित निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येतील. अधिक माहितीसाठी दुरध्वनी क्र. ०२२-२५३४७७१४ या क्रमांकावर संपर्क साधावा.

ठामपा/पिआरओ/पिडब्ल्यूडी-मु/२२७/२०२४-२५ सही/-
दि:०१.०८.२०२४ नगरअभियंता
**Pls visit our oficial web-site www.thanecity.gov.in** ठाणे महानगरपालिका, ठाणे



**वसई – विरार शहर महानगरपालिका**
**प्रभाग समिती "अे"**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अधिनियम ४६७, प्रकरण ३ मधील १ (१) व १ (२) अन्वये जाहीर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई–विरार शहर महानगरपालिका विभागीय कार्यालय विरार प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपत्वे नोटीसनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आत हितसंबंधकाने हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई–विरार शहर महानगरपालिका विभागीय कार्यालय बोळींज येथे लेखी स्वरूपात हरकत नोदवावी अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करून महागरपालिका मध्ये याबाबतची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र | दिनांक | मालमत्ता क्र. | वार्ड क्र. | मालमत्तेचे ठिकाण | ज्यांचे नावे मालमत्ता आहे त्यांचे नावे म्हणजे मालमत्ता विकणा–याचे नाव किंवा अभिहस्तांन कत्याचे नाव | खदीदाराचे किवा अभिहस्तांकन कत्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ०४–०७–२०२४ | VR१७/६९२/४८ | १७ | न्यु होम पॅराडाईज, विंग नं. ४, शॉप नं. ०१ सेक्टर नं. २ | राजीव शंकर गायकवाड | किरण एकनाथ दाणे |
| २ | ०४–०७–२०२४ | VR१७/७०८/४७४ | १७ | वाय के नगर, ग्लोबलसिटी बच्छराज लाईफस्पेस, डी विंग | सविता अमर ठाणेकर व अमर रामचंद्र ठाणेकर | कविराज सांगीदानजी चारण |
| ३ | ०४–०७–२०२४ | VR१३/३०/२२ | १३ | परेश बिल्डींग नं. ७ | कृष्णकुमार निरकमदास सागर | आश्विनी स्वप्नील बांदकर |
| ४ | ०४–०७–२०२४ | VR२७/१३०/५४ | २७ | एम बी इस्टेट, रश्मीनगर, विठ्ठल हरी टॉवर, रूम नं.बी २०३ | बीना बी शाह | विजया शंकर इंगळे |
| ५ | ०४–०७–२०२४ | VR१७/५१८/२३७ | १७ | शॉप नं. ७३, ग्लोबलसिटी, रूस्तजी जॉईन वेन्चर, एव्हेन्यु जे | रूस्तमजी एव्हरशाईन जॉईट वेन्चर | निलम संतोष महाडीक |
| ६ | ०४–०७–२०२४ | VR१७/६३४/१३ | १७ | जिवदानी दर्शन चाळ, चाळ नं. ४ जयश्रीनगर नारंगी डोंगरपाडा | रामचंद्र सरका शर्मा | शिवकुमारी देवी मोतीलाल शर्मा |
| ७ | ०४–०७–२०२४ | VR१७/६३७/४३ | १७ | डी–१००१, साई राज, सेक्टर नं. २, बि.नं. ३, विंग, एच डी आय एल. लेआऊट | अर्चना सिंग व मनोजकुमार सिंग | विशाल सत्यप्रकाश सुर्वे व लतिका विशाल सुर्वे |
| ८ | ०४–०७–२०२४ | VR१३/६१/१६ | १३ | सनी साईड ब / २०१ राममंदिर रोड | सरिता पी बक्षी | दिपक भाईचंद पुरबिया व कमलाबेन भा. पुरबिया |
| ९ | ०४–०७–२०२४ | VR१७/५१८/९९३ | १७ | रूस्तमजी एव्हरशाईन जॉईट वेंन्चर एव्हेन्यु जे नारींगी | प्रविण महादेव धोत्रे | भुपेंद्र अवधेश शर्मा व हंसादेवी भु. शर्मा |
| १० | ०४–०७–२०२४ | VR१७/६७७/६१९ | १७ | एकता पार्क्सविले, सेंट्रल पार्क, बि.नं. १४, रूम नं. एफ/१०३ | काळुराम प्रजापती व मंगीलाल प्रजापती | देवेंद्र गोस्वामी व सरस्वती देवी |
| ११ | ०४–०७–२०२४ | VR१७/५५०/६६ | १७ | रूस्तमजी एव्हरशाईन जॉईंट वेंचर एव्हेन्यु एम नारींगी | करूणाकर व्ही गुजारन | राकेश रमेश बैकर |
| १२ | ०४–०७–२०२४ | VR१७/६०४/२५ | १७ | एव्हेन्यु डी बि.नं. ४०, रूम नं. ६०४, ग्लोबलसिटी, डोंगरपाडा | जयप्रकाश आर. उपाध्याय व निशा जे. उपाध्याय | सुमती दिपक सिंह |
| १३ | ०४–०७–२०२४ | VR१७/५५२/२१ | १७ | रूस्तमजी एव्हरशाईन जॉईंट वेंचर एव्हेन्यु एम नारींगी | गधीराजु वेंकटा क्रिष्णम राजु | ईश्वर अंबिका तिवारी व वंदना ईश्वर तिवारी व शीलम अंबिका तिवारी |
| १४ | ०४–०७–२०२४ | VR१७/६७५/१२६७ | १७ | एक्रोपोलिस सेंक्टर ३, बिं.नं. ३ व ४, रूम नं.ओ / ११०२ | मंजू मधुसुदन यादव व मधुसुदन बळराम यादव | संदीप रविशंकर मिश्रा व सुघ संदीप मिश्रा |
| १५ | ०४–०७–२०२४ | VR१७/५३१/१८ | १७ | रूस्तमजी एव्हरशाईन जॉईट वेंचर, जी– नारंगी | सय्यद हसीब | पबन मुक्तिनाथ झा व साधना पबन झा |
| १६ | ०४–०७–२०२४ | VR१७/५४७/१६ | १७ | रूस्तमजी एव्हरशाईन जॉईट वेंचर, नारंगी | चंद्रहास कुट्टी शेट्टी | अशोकुमार कहार |
| १७ | ०५–०७–२०२४ | VR१७/५६७/३२ | १७ | श्री शास्वत ओ / ४ जी जी बि.नं.१ ग्लोबलसिटी | पारूल राहुल खोत | घनश्याम सिंह |
| १८ | ०५–०७–२०२४ | VR१७/६५८/३५१ | १७ | विनय युनिक गार्डन्स, सेंक्टर नं. २ बि.नं. ११, ई विंग एचडीआयएल | विनय युनिक डेव्हलपर्स | आतुल पांडेय व संगम मार्कडेय पाण्डेय |
| १९ | ०५–०७–२०२४ | VR१७/५१२/७५ | १७ | रूस्मजी एव्हरशाईन जॉईट वेंचर एव्हेन्यु जे विंग नं. वाय १–२६ | के. वी. एस. एन मुर्ती | विपुलकुमार आर पटेल व जैमिनी पटेल |
| २० | ०५–०७–२०२४ | VR१७/६२५/२५ | १७ | कासा विस्टा बि.नं. ८, एव्हेन्यु ए/२, रूम नं. ३०३ ग्लोबलसिटी | अलका संजय सांळुखे | दिपक श्रीनिवास सातारकर व सुनिता दि. सातारकर |

जा.क्र. वविशम बोळींज/१६२/२०२४–२५
दिनाक :– ३१/०७/२०२४

(शशिकांत पाटील)
प्र. सहा. आयुक्त
वसई–विरार शहर महानगरपालिका




थोर स्वातंत्र्यसेनानी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त तसेच साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंती निमित्त नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने मुख्यालयातील ॲम्फिथिएटर येथे महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या शुभहस्ते प्रतिमापूजन करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी प्रशासन विभागाचे उपआयुक्त शरद पवार, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. प्रशांत जवादे, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ.अजय गडदे, अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे, भांडार विभागाचे उपआयुक्त राजेंद्र चौगुले, प्रशासकीय अधिकारी सर्वश्री उत्तम खरात, विलास मलुष्टे, संजीव पवार, रवि जाधव आणि इतर अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.



ठाणे महानगरपालिका मुख्यालय येथील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात लोकशाहीर, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमास, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, उपायुक्त (मुख्यालय) जी. जी. गोदेपुरे, उपायुक्त (माहिती व जनसंपर्क) उमेश बिरारी, उपायुक्त (शिक्षण) सचिन पवार, सहाय्यक आयुक्त प्रितम पाटील यांच्यासह ठाणेकर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



ठाणे महानगरपालिका मुख्यालय येथील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमास, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, उपायुक्त (मुख्यालय) जी. जी. गोदेपुरे, उपायुक्त (माहिती व जनसंपर्क) उमेश बिरारी, उपायुक्त (शिक्षण) सचिन पवार, सहाय्यक आयुक्त प्रितम पाटील यांच्यासह ठाणेकर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची जयंती पनवेल तालुका व शहर भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात साजरी करण्यात आली. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, तालुका सरचिटणीस भूपेंद्र पाटील, उमेश इनामदार, तुकाराम पाटील यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अभिवादन केले.

# 'नवी मुंबई विमानतळाला दि. बा. पाटीलांचे नाव द्या'

## केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्याकडे कृती समितीची आग्रही मागणी

नवी दिल्ली : नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला 'लोकनेते डी.बी. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ' असे नाव देण्यासाठी आपण आग्रही रहावे, अशी विनंती लोकनेते दि.बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण सर्वपक्षीय कृती समितीच्या वतीने केंद्रिय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांना नवा दिल्ली येथील नवीन संसद भवनात आज करण्यात आली.



*■ यावेळी कृती समितीचे उपाध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, कृती समितीचे कार्याध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि माजी खासदार संजीव नाईक तसेच कृती समितीचे कार्यकारिणी सदस्य आमदार महेश बालदी आणि दि.बा.पाटील यांचे चिरंजीव अतुल पाटील उपस्थित होते. या सर्वांनी कृती समिताचे एक निवेदन केंद्रीय राज्यमंत्री मोहोळ यांना दिले.*

*■ केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी यावेळी सकारात्मक प्रतिसाद दिला. यासंदर्भात आपण निश्चित पुढाकार घेऊ. तसेच आंतरराष्ट्रीय विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव देण्याबाबत थोड्याच दिवसात माझ्या खात्याच्या कॅबिनेट मंत्र्यांसोबत बैठक घेऊन त्यांच्याशी नक्कीच सकारात्मक चर्चा करू, असेही केंद्रीय राज्यमंत्री मोहोळ यांनी ठोस आश्वासन दिले.*

केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी यावेळी सकारात्मक प्रतिसाद दिला. यासंदर्भात आपण निश्चित पुढाकार घेऊ. तसेच आंतरराष्ट्रीय विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव देण्याबाबत थोड्याच दिवसात माझ्या खात्याच्या कॅबिनेट मंत्र्यांसोबत बैठक घेऊन त्यांच्याशी नक्कीच सकारात्मक चर्चा करू, असेही केंद्रीय राज्यमंत्री मोहोळ यांनी ठोस आश्वासन दिले.

सर्वपक्षीय कृती समितीने यापूर्वी तत्कालीन नागरी विमान वाहतूक मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांच्या नवी दिल्लीतील कार्यालयात आणि नवी मुंबईतील साइट कार्यालयात भेट घेतली असता त्यांनीही नामकरणासाठी पूर्ण पाठिंबा आणि मदतीची ग्वाही दिली होती, याचा उल्लेखही या निवेदनात केला आहे.

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र विधानसभेत या नामकरणासाठी ठराव मंजूर केला आणि तो ठराव नवी दिल्लीतील नागरी विमान वाहतूक मंत्रालयाकडे पाठवला आहे. या ठरावाच्या पाठपुराव्यासाठी हे निवेदन आम्ही आपणास सादर करीत आहोत, असे कृती समितीच्या वतीने लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांना सांगितले.

त्या आंदोलनात सहभागी झालेल्या महाराष्ट्रातील आणि विशेषत: ४ जिल्ह्यांतील जनतेच्या वतीने आम्ही सर्वपक्षीय समिती नम्र विनंती करतो की, कृपया यासाठीची प्रक्रिया लवकरात लवकर करून नवी मुंबई विमानतळाचे नाव लोकनेते डी.बी. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ करावे, असेही अखेरीस निवेदनात नमुद करण्यात आले आहे.

# मलेरिया, डेंग्यूला रोखण्यासाठी विशेष तपासणी शिबिरांचे आयोजन



नवी मुंबई : नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्राची भौगोलिक रचना, येथील रहिवाशी व स्थलांतरित लोकसंख्या, यामुळे नमुंमपा कार्यक्षेत्र हिवताप, डेंग्यू अशा आजारासाठी संवेदनशील आहे. यादृष्टीने आरोग्य विभागामार्फत संपूर्ण महापालिका कार्यक्षेत्रात प्रत्यक्ष सर्वेक्षण तसेच साप्ताहिक वेळापत्रकानुसार नियोजित डास अळीनाशक फवारणी व रासायनिक धुरीकरण, घरांतर्गत डास उत्पत्ती शोध मोहीम अशा रितीने नियमित स्वरुपात हिवताप, डेंग्यू या आजारांचा प्रसार रोखण्यासाठी उपाययोजना करण्यात येतात.

तथापि महापालिका कार्यक्षेत्रातील मलेरिया, डेंग्यूचे प्रमाण रोखण्यासाठी आणखी ठोस उपाययोजना राबविण्याचे निर्देश महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या वतीने आरोग्य विभागास देण्यात आलेले असून त्यानुसार महानगरपालिकेच्या सर्व २४ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांमार्फत त्यांच्या कार्यक्षेत्रात दि. ३ आणि ५ ऑगस्ट २०२४ रोजी राष्ट्रीय किटकजन्य रोग यि राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण शिबिरामध्ये सर्व तापाच्या रुग्णांचे रक्तनमुने घेण्यात येणार आहेत तसेच हिवताप, डेंग्यू या आजारांबाबत माहिती देण्यात येणार आहे. या शिबिरांची वेळ सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत असणार आहे.

नवी मुंबई महानगरपालिका आरोग्य विभागमार्फत नियमितपणे साप्ताहिक वेळापत्रकानुसार डास व अळी नाशक फवारणी कार्यक्रम, बंद गटारात रासायनिक धुरीकरण कार्यक्रम, घरांतर्गत डासोत्पत्ती स्थाने तपासणी मोहीम राबविण्यात येते, त्यामध्ये डासअळ्या आढळल्यास त्या अळ्या नागरिकांना दाखवून, नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात येते. प्रत्येक हिवताप, डेंग्यू रुग्णाच्या सभोवतालच्या १०० घरांमध्ये डास अळ्या शोधणे, पावडर फवारणी करणे, तापाच्या रुग्णांचे सर्वेक्षण करुन रक्त नमुने घेणे अशा प्रकारची कार्यवाही करण्यात येते.

तसेच आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत कार्यक्षेत्रात गृहभेटी देऊन प्रत्येक तापाच्या रुग्णाचा रक्त नमुना घेण्यात येतो व मार्गदर्शक सूचनांनुसार उपचार करण्यात येतात. महानगरपालिकेच्या रुग्णालयात किंवा ना.प्रा.आ केंद्रात येणाऱ्या प्रत्येक तापाच्या रुग्णांचा रक्तनमुना घेऊन उपचार देण्यात येतो.

हिवताप, डेंग्यू आजारावर नियंत्रण मिळविण्यासाठी नागरिकांच्या प्रत्यक्ष सहभागाची आवश्यकता असून नमुंमपा कार्यक्षेत्रातील नागरिकांनी दि. ३ व ५ ऑगस्ट २०२४ रोजी आपल्या क्षेत्रातील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वतीने आयोजित करण्यात येत असलेल्या राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण विशेष शिबिरांचा लाभ घेऊन ताप असल्यास रक्ताची तपासणी करुन घ्यावी तसेच हिवताप / डेंग्यू आजाराबाबत माहिती करून घ्यावी व ती अंमलात आणावी असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# शेकाप कार्यकर्त्यांना निष्ठेची मात्रा, पंधरा वर्षांत शेकापक्षाला उतरती कळा

उरण : एकेकाळी शेतकरी कामगार पक्षाचे उरण-पनवेल तालुके हे बालेकिल्ले म्हणून गणले जात होते. माजी खासदार दि. बा. पाटील, दत्तूशेठ पाटील, विवेक पाटील, दत्ता पाटील व मीनाक्षी पाटील यांनी या तालुक्यात विजय संपादित केले आहेत.

मागील पंधरा वर्षांत या दोन्ही तालुक्यांतील शेकापची ताकद काही प्रमाणात क्षीण झाली आहे. त्यामुळे या दोन्ही तालुक्यांतील विधानसभा निवडणुकीत पराभवाचा सामना करावा लागला आहे. मात्र तरीही या दोन्ही तालुक्यांतील गावोगावच्या निष्ठावान कार्यकर्त्यांनी आपलं स्थान राखून ठेवलं आहे व आपल्या जुन्या ताकदीत वाढ करण्याचा प्रयत्न करीत आहेत. नुकताच झालेल्या लोकसभा निवडणुकीत या दोन्ही तालुक्यांतील पक्ष कार्यकर्ते सक्रिय झाले आहेत.

या दोन्ही तालुक्यांत लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला पराभवाचा सामना करावा लागला तरी शेकापच्या ताकदीत वाढ झाल्याचा दावा नेत्यांकडून केला जात आहे. अनेक वर्षे उरण तालुका हा पनवेल आणि अलिबाग या दोन विधानसभा मतदारसंघांत विभागला गेला होता. त्यामुळे यातील बहुतांशी निवडणुका या शेतकरी कामगार पक्षाने जिंकल्या आहेत. मात्र पनवेलमध्ये शेकापमधून रामशेठ ठाकूर बाहेर पडून प्रथम काँग्रेस तर सध्या भाजपाच्या माध्यमातून आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे.

२००९ च्या मतदारसंघ पुनर्रचनेत उरण विधानसभा मतदारसंघ स्वतंत्र झाला आहे. यात पहिली निवडणूक महायुती म्हणून शेकापने जिंकली होती. तर २०१४ ला स्वतंत्र निवडणूक लढवीत शिवसेनेने जिंकली होती. २०१९ मध्ये भाजपच्या साह्याने अपक्षाने जिंकली. या निवडणुकीत शेकाप २००९ च्या निवडणुकीत पहिल्या क्रमांकावर होता. तर २०१९ मध्ये तिसऱ्या क्रमांकावर आला आहे. मात्र तरीही या निवडणुकीत शेतकरी कामगार पक्षाला ६० हजार मते मिळाली होती. याच कालावधीत उरण विधानसभेचे माजी आमदार विवेक पाटील हे तुरुंगात होते. त्यामुळे अनेक कार्यकर्त्यांनी भाजपची वाट धरली. त्यामुळे शेकापची ताकद घटली आहे. याही परिस्थितीत निष्ठेने काम करणारे कार्यकर्ते पक्षात टिकाव धरून आहेत. याच पार्श्वभूमीवर विवेक पाटील तुरुंगातून बाहेर येण्याची चिन्हे आहेत. त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये नव्याने उत्साह संचारला आहे. याचा परिणाम या कार्यक्रमाला कार्यकर्ते जोमाने कामाला लागले आहेत.

अल्पसंख्यांक विकास विभागाच्या योजनांसाठी

# इच्छुक संस्थांनी अर्ज करावेत : जिल्हा नियोजन अधिकारी वैभव कुलकर्णी

ठाणे : महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभागाच्या 'राज्यातील धार्मिक अल्पसंख्यांक विद्यार्थीबहुल शासनमान्य खाजगी अनुदानित / विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नगरपालिका / नगरपरिषद शाळा व अपंग शाळामध्ये अल्पसंख्यांक विकास विभागाच्या माध्यमातून पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या अनुदान योजना आणि डॉ. झाकीर हुसैन मदरसा आधुनिकीकरण योजनेंतर्गत सन २०२४-२५ करिता प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन जिल्हा नियोजन अधिकारी वैभव कुलकर्णी यांनी केले आहे.

इच्छुक शाळा / मदरसा यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करण्याचा अंतिम दि. १५ सप्टेंबर, २०२४ असून जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त प्रस्तावांची छाननी करुन व त्रुटींची पूर्तता करुन अंतिमरित्या पात्र प्रस्ताव शासनास सादर करण्याचा अंतिम दिनांक प्रस्ताव प्राप्त झाल्यापासून ते दि. १५ ऑक्टोबर २०२४ पर्यंत आहे.

तरी इच्छुक व पात्र संस्थांनी त्यांचे विहित नमुन्यातील प्रस्ताव व अर्ज जिल्हा नियोजन समिती, तिसरा मजला, नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, ठाणे येथे सादर करावेत, असे आवाहन जिल्हा नियोजन अधिकारी वैभव कुलकर्णी यांनी केले आहे.




ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची जयंती त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या हस्ते साजरी करण्यात आली. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी सुदाम परदेशी, तहसिलदार रेवण लेंभे व जिल्हाधिकारी कार्यालयातील इतर कर्मचाऱ्यांनीही साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

# साडेतीन वर्षाच्या बालकावर कर्णरोपणाची मोफत शस्त्रक्रीया

पनवेल : साडेतीन वर्षाच्या बालकावर यशस्वीरित्या कर्ण रोपणाची शस्त्रक्रिया कामोठे येथील महात्मा गांधी मीशन रुग्णालयात (एमजीएम) गुरुवारी झाली. रायगड जिल्हा व नवी मुंबईतील ही पहिलीच शस्त्रक्रीया आहे. अवघ्या १५ दिवसात या शस्त्रक्रीयेसाठी दोन वेगवेगळ्या धर्मादाय संस्थांनी दिलेल्या आर्थिक मदतीमुळे आणि एमजीएम रुग्णालयाच्या वैद्यकीय मदतीमुळे ही शस्त्रक्रीया करु शकलो, असे मत नाक, घसा व कानाचे डॉक्टर मनीष जुवेकर यांनी व्यक्त केले. शस्त्रक्रीया यशस्वी झाल्यानंतर गुरुवारी दुपारी एमजीएम रुग्णालयाचे संचालक डॉ. सूधीर कदम यांनी डॉ. मनीष व त्यांच्यासोबत सोबत काम करणा-या सर्वांचे कौतुक केले. या शस्त्रक्रीयेमुळे एका बालकाला सामान्य बालकांप्रमाणे जगता येणार आहे.

जन्मापासून मूकबधीर असलेल्या या मुलाच्या कर्णरोपणाच्या शस्त्रक्रीया करीता त्याचे पालक विविध ठिकाणी वैद्यकीय मदतीसाठी पाठपुरावा करत होते. एमजीएम रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. कुलदीप सलगोत्रा, डॉ. कल्पना राजीवकुमार, डॉ. राहुल, प्रोफेसर स्वप्नील गोसावी, भूलतज्ज्ञ डॉ. जशी साबू, डॉ. अनिंदा, डॉ. सूरभी यांनी ही शस्त्रक्रीया यशस्वी करण्यासाठी योगदान दिल्याचे डॉ. मनीष म्हणाले. मूकबधीरतेची समस्या समजल्यावर पालकांनी बालकांचे वय अठरा महीने ते साडेतीन वर्षे होईपर्यंत ही शस्त्रक्रीया केल्यास बालकांना सामान्य मुलांप्रमाणे जगता येऊ शकेल. मुंबईतील मोजक्या रुग्णालयात ही शस्त्रक्रीया विनामुल्य होते. राधामोहन मेहरोत्रा संस्था व वटूमल संस्थेच्या संयुक्त विद्यमाने ६ लाख ३० हजार कर्णरोपणाचे यंत्र अवघ्या १५ दिवसात सर्व कागदोपत्री व्यवहार पुर्ण करुन बालकाला मिळाले तसेच एमजीएम रुग्णालयाने वैद्यकीय खर्च उचलला त्यामुळे १० लाख रुपयांची ही शस्त्रक्रीया होऊ शकली. महात्मा ज्योतिबा फुले योजनेत या शस्त्रक्रीयेसाठी पाच लाख रुपयांची तरतूद केली आहे.

'मुख्यमंत्री – माझी लाडकी बहीण' योजनेच्या

# अर्ज छाननी प्रक्रियेला नवी मुंबई पालिका मुख्यालयात वॉर रुमव्दारे गती

नवी मुंबई : महाराष्ट्र राज्य शासनाच्या महिला व बाल विकास विभागाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या 'मुख्यमंत्री – माझी लाडकी बहीण' योजनेमध्ये नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील एकही पात्र महिला वंचित राहू नये याकरिता नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली क्षेत्रीय स्तरापर्यंत सूक्ष्म नियोजन करण्यात आले असून त्याबाबत सातत्याने आढावा घेतला जात आहे.

यामध्ये जास्तीत जास्त महिलांपर्यंत योजनेची माहिती पोहोचवून पात्र महिलांकडून अर्ज भरुन घेण्यात येत असून त्याचवेळी प्राप्त अर्जांची पडताळणी सुरु करण्यात आलेली आहे. जेणेकरुन सर्व आवश्यक कागदपत्रांसह अर्ज दाखल केलेल्या पात्र महिलांना योजनेचा लाभ पहिल्या टप्प्यातच उपलब्ध होईल.

या अनुषंगाने पोर्टलवरील महिला लाभार्थ्यांच्या प्राप्त अर्जांची जलद गतीने छाननी करुन त्यांना योजनेचा लाभ मिळण्याकरिता आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली नमुंमपा मुख्यालयामध्ये दोन वॉर रूम स्थापन करण्यात आलेल्या आहेत.

याठिकाणी आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार व समाज विकास विभागाचे उपआयुक्त तथा योजनेचे नोडल अधिकारी श्री. किसनराव पलांडे व सहा. नोडल अधिकारी श्री. प्रबोधन मवाडे यांच्यासह भेट देत कामकाजाची प्रत्यक्ष पाहणी केली व कामाला नियोजनबध्द गती देण्याचे निर्देशित केले.

दि. ३१ जुलै, २०२४ पर्यंत नवी मुंबई महानगरपालिकेने १११ प्रभागांमध्ये स्थापन केलेल्या अंगणवाडी केंद्रासह एकुण ३२९ ठिकाणांहून 'मुख्यमंत्री – माझी लाडकी बहीण' योजनेचे ऑनलाईन २७,०४६ व ऑफलाईन २१,५८३ असे एकूण ४६,६२९ अर्ज प्राप्त झालेले आहेत.



सदर प्राप्त अर्जांची पडताळणी वार्डस्तरीय समितीमार्फत करण्यात येत आहे. या संदर्भात आयुक्तांनी दिलेल्या निर्देशानुसार उपआयुक्त, समाजविकास किसनराव पलांडे यांनी सर्व विभागांचे सहा. आयुक्त यांची ऑनलाईन बैठक घेऊन तांत्रिक अडचणींबाबतच्या शंकांचे निरसन केले आहे व सर्व विभाग अधिकारी यांनी जास्तीत जास्त ऑनलाईन अर्जांची छाननी करावी असे निर्देशित केले आहे.

याशिवाय प्राप्त अर्जांची छाननी आणखी जलद गतीने व्हावी याकरिता आयुक्तांच्या निर्देशानुसार नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयामध्ये ०२ ठिकाणी वॉर रुमची स्थापना करण्यात आलेली असून ४० कर्मचा-यांची २ सत्रात नेमणूक करण्यात आलेली आहे. याकरिता सकाळी ८ ते दुपारी ३ तसेच दुपारी ३ ते रात्री १० अशा २ सत्रात छाननीचे काम सुरू करण्यात आलेले आहे.

'मुख्यमंत्री – माझी लाडकी बहीण' योजनेच्या प्रभावी अंमलबजावणी करिता नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये बॅनर, पोस्टर, होर्डींग, हँडबिल तसेच सोशल मिडीया व वर्तमानपत्रे अशा विविध माध्यमांतून व्यापक जनजागृती करण्यात आलेली असून समुह संघटक, आशा वर्कर, अंगणवाडी सेविका यांच्या मार्फतही महिला बचत गट व महिलांच्या प्रत्यक्ष भेटी घेऊन योजनेची माहिती दिली जात आहे व अर्ज भरुन घेतले जात आहे.

'मुख्यमंत्री – माझी लाडकी बहीण' योजनेमधील पात्र महिलांना लवकरात लवकर लाभ मिळावा याकरिता नवी मुंबई महानगरपालिकेने आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार अर्ज भरुन घेणे तसेच पोर्टलवर दाखल अर्जांची छाननी करणे या दोन्ही कामांना समांतर गती दिलेली आहे.

तरी ज्या पात्र महिलांनी अद्याप अर्ज दाखल केलेला नसेल त्यांनी लवकरात लवकर अर्ज भरून दरमहिना रू. १५००/- मात्र इतक्या रक्कमेचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात येत आहे.

# कल्याण डोंबिवली पालिका कर्मचाऱ्यावर खंडणीचा गुन्हा

## आरोपींमध्ये चार जणांचा समावेश

डोंबिवली: डोंबिवली शहरातील एका विकासकाकडे डिसेंबर २०१८ ते जुलै २००२४ या कालावधीत त्यांच्या शहरातील विविध बांधकाम प्रकल्पांविषयी कल्याण डोंबिवली पालिका, शासकीय कार्यालयांमध्ये ती बांधकामे अनधिकृत आहेत म्हणून तक्रारी करून, त्याविषयी समाज माध्यमांमध्ये या प्रकल्पांची माहिती सामायिक करून संबंधित विकासकाची बदनामी करणाऱ्या, तसेच या विकासकाकडून सात वर्षाच्या कालावधीत ४१ लाख रूपये रोख आणि चार सदनिका जबरदस्तीने खंडणी स्वरुपात घेणाऱ्या एक पालिका कर्मचारी, त्याचे तीन साथीदार आणि एका माहिती कार्यकर्त्या विरुध्द खंडणी विरोधी पथकाने मंगळवारी खंडणीचा गुन्हा विष्णुनगर पोलीस ठाण्यात दाखल केला.

विनोद मनोहर लकेश्री, प्रशांत शिंदे, विलास शंभरकर, परेश शहा आणि मागील अनेक वर्ष डोंबिवलीतील बेकायदा बांधकामांच्या विरुध्द निर्भय बनो संस्थेच्या माध्यमातून आवाज उठविणारे माहिती कार्यकर्ते महेश दत्तात्रय निंबाळकर यांच्या विरुध्द ठाणे येथील खंडणी विरोधी पथकाचे साहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकृष्ण गोरे यांनी विकासक प्रफुल्ल गोरे यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल केला आहे.

लकेश्री हे कल्याण डोंबिवली पालिकेत वाहन चालक म्हणून कार्यरत आहेत. ते पालिकेच्या अ प्रभागात घनकचऱ्याच्या वाहनावर कर्तव्यावर आहेत. काही महिन्यापूर्वी त्यांच्यावर पालिकेच्या डोंबिवली विभागीय कार्यालयाबाहेर भूमाफियांकडून हल्ला करण्यात आला होता. त्यातून ते थोडक्यात बचावले होते. डोंबिवली पश्चिमेतील कुंभारखाणपाडा येथील बांधकाम गृहप्रकल्पात हा प्रकार २०१८ ते २०२४ या कालावधीत घडला असल्याचे तक्रारीत म्हटले आहे. पोलिसांनी सांगितले, डोंबिवलीतील विकासक प्रफुल्ल मोहन गोरे (४०, रा. रिजन्सी अनंतम, शिळ रस्ता, डोंबिवली) यांचे डोंबिवलीत डिसेंबर २०१८ पासून कुंभारखाणपाडा, देसलेपाडा, कोपर रस्ता, गोग्रासवाडी भागात इमारत बांधकाम प्रकल्प सुरू होते. या कालावधीत आरोपींनी विकासक प्रफुल्ल गोरे यांचे प्रकल्प अनधिकृत आहेत. ते तोडण्यात यावेत म्हणून पालिका कार्यालये, शासकीय कार्यालयांमध्ये तक्रारी केल्या. या बांधकामांची छायाचित्रे समाज माध्यमांवर सामायिक करून या गृहप्रकल्पांमध्ये कोणी घर घेऊ नये म्हणून विकासकाला अडचणीत आणण्याचा प्रयत्न केला. या गृहप्रकल्पांच्या तक्रारी मागे घेण्यासाठी आरोपींनी तक्रारदार विकासक प्रफुल्ल गोरे यांच्याकडून वेळोवेळी एकूण ४१ लाख रूपये खंडणी स्वरुपात उकळले. तसेच डोंबिवली येथील गृहप्रकल्पातील चार सदनिका खंडणी स्वरुपात जबरदस्तीने बळकावल्या. विकासकाच्या या तक्रारीच्या अनुषंगाने हा गुन्हा खंडणी विरोधी पथकाने दाखल केला आहे. या प्रकरणातील लकेश्री आणि त्याचे तीन साथीदार फरार असून खंडणी विरोधी पथक त्यांचा शोध घेत आहे.

या तक्रारीसंदर्भात निर्भय बनोचे संस्थापक महेश निंबाळकर यांनी सांगितले, आपणास यासंदर्भात काहीही माहिती नाही. आपण डोंबिवलीतील सर्व बेकायदा बांधकामांच्या तक्रारी अनेक वर्ष पालिकेत करत आहोत. त्या विरुध्द आपली उपोषणे सुरू आहेत. या बेकायदा बांधकाम विषयावरून पालिका कारवाई करत नाही म्हणून आपण मागील साडे तीन वर्षापासून उपोषण करत आहोत. कुंभारखाणपाडा येथील बेकायदा गृहप्रकल्पाविषयी आपण आवाज उठविला आहे. आपण बेकायदा बांधकामांच्या विरुध्द आवाज उठवितो म्हणून आपला आवाज दाबण्यासाठी आपणास खोट्या गुन्ह्यात अडकविण्याचा हा प्रयत्न आहे. यासंदर्भात आपण वेळ आली तर चौकशी अधिकाऱ्यांना बेकायदा बांधकामांच्या विरुध्द आपण देत असलेल्या लढ्याविषयी साद्यंत माहिती देऊ.

# कल्याण नगर मार्गावरील शहाड पूलाला भगदाड

## कल्याणकडे येणाऱ्या मार्गिकेवरील वाहतूक बंद, प्रवाशांच्या त्रासात भर

उल्हासनगर: कल्याण शहराला कल्याण तालुक्यासह, मुरबाड, अहमदनगर जिल्ह्याला जोडण्यासाठी महत्वाच्या असलेल्या कल्याण अहमदनगर राष्ट्रीय महामार्गावरील शहाड पुलाला कल्याणकडे जाणाऱ्या मार्गिकेवर भगडाद पडल्याने ती मार्गिका वाहतुकीसाठी बंद करण्यात आली आहे. तसेच पुलावर येणारी अवजड वाहतूक बंद करण्यात आली असून ही वाहतूक गोवेली - टिटवाळा - कल्याण आणि रायते - दहागाव - बदलापूर मार्गे वळवण्यात आली आहे. पूलावरील एकच मार्गिका सुरू असल्याने वाहनचालकांची मोठी कसरत होते आहे.

### महत्वाचा महामार्ग आणि पूलही

शहाड येथील कल्याण अहमदनगर राष्ट्रीय महामार्गावरील पूल वाहतुकीच्या दृष्टीने महत्वाचा आहे. या पुलाची गेल्या काही वर्षात मोठी वाताहत झाली. दरवर्षी पावसाळ्यात या पुलावर खड्डे पडतात. त्याच्या विस्तारीकरणासाठी प्रयत्न सुरू असले तरी त्याला अद्याप यश आलेले नाही. त्यामुळे येथून प्रवास करताना कायमच वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो. या पुलामुळे कल्याणशहरात न जात थेट कल्याण आग्रा राष्ट्रीय महामार्ग, भिवंडी शहर, ठाणे तसेच मुंबईकडे जाता येते. त्याचप्रमाणे मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गापर्यंत पोहोचण्यासाठीही हाच पुल फायद्याचा ठरतो. त्यामुळे या पुलाकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी स्थानिक प्रवासी करत आहेत.



गेल्या काही वर्षात कल्याण अहमदनगर राष्ट्रीय महामार्गावर वाहतूक मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. कल्याण शहर आणि उल्हासनगर शहराला तसेच शहाड गावठाण, कल्याण तालुक्यातील ग्रामीण भाग या भागांना जोडण्यासाठी कल्याण अहमदनगर राष्ट्रीय महामार्ग आणि विशेषतः शहाड पूल महत्वाचा आहे. अहमदनगर, पुणे जिल्ह्यातून येणारा शेतीमाल, भाजीपाला, दूध यासाठीही हा महामार्ग महत्वाचा आहे. मात्र गेल्या काही दिवसांपासून या मार्गावरील शहाड येथील पूलाला मोठे खड्डे पडले होते. त्यामुळे वाहतूक कोंडीचा मोठा सामना वाहनचालकांना करावा लागतो आहे. त्यातच बुधवारी याच शहाड पुलाला कल्याणकडे जाणाऱ्या मार्गिकेवर भगदाड पडले. त्यामुळे पुलावरून थेट खालच्या रस्त्याचा पृष्ठभाग दिसत होता. याची माहिती मिळताच राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या ठाणे उपविभागीय अभियंत्यांनी वाहतूक पोलिसांना पत्र देत हा पूल अवजड वाहनांसाठी बंद करण्याची विनंती केली. त्यानंतर वाहतूक पोलिसांनी या पुलावरील अवजड वाहतूक थांबवली. त्यामुळे ही वाहने माघारी परतवण्यात आली. तर कल्याणकडे जाणारी मार्गिका बंद करून दुरूस्तीचे काम सुरू करण्यात आले. त्यामुळे या ठिकाणी मोठी वाहतूक कोंडी झाली होती. तर या पुलावरून कल्याणकडे जाणारी अवजड वाहतूक गोवेली – टिटवाळा – कल्याण मार्गे आणि रायते – दहागाव – बदलापूर मार्गे वळवण्यात आली.

# ठाणे-बेलापूर मार्गावर वाहतूक कोंडी

नवी मुंबई : झोपडपट्टी पुनर्वसन साठी ठाणे बेलापूर मार्गावर चिंचपाडा गावाच्या प्रवेशद्वारावर आंदोलन सुरू आहे. नवी मुंबई शिवसेना (शिंदे गट) जिल्हाध्यक्ष विजय चौगुले यांनी आमरण उपोषण सुरू केले आहे. या आंदोलन दरम्यान झोपडपट्टी वासीय प्रचंड संख्येने उपस्थित झालेले आहेत. मात्र त्यामुळे ठाण्याकडून तुर्भे बेलापूर दिशेची वाहतूक कोंडी झाली आहे. वाहतूक पोलिसांनी तीन पैकी एकच मार्गिका सुरू ठेवल्याने किमान पाऊण किलोमीटर पर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या आहेत.

याच वाहतूक कोंडीत रुग्णवाहिका अडकली होती ही बाब लक्षात आल्यावर स्वतः विजय चौगुले यांनी भाषण थांबवून रुग्णवाहिकेला मार्ग देण्याचे आवाहन केले आणि काही वेळेत रुग्णवाहिका वाहतूक कोंडीतून बाहेर पडली. ही वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी वाहतूक पोलिसांनी दमछाक होत आहे.त्यामुळे वाहतूक पोलिसांची अधिक कुमक मागवण्यात आली आहे. अशी माहिती एका वाहतूक पोलीस कर्मचाऱ्यांनी दिली.

वाहतूक कोंडी पाहता साडे अकराच्या सुमारास चौगुले यांनी सर्वांना घरी जाण्याचे आवाहन केले. केवळ उपोषणात सहभागी असणाऱ्या आंदोलकांनी थांबावे असे आवाहन केले.

## सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांचे दहा दिवस दप्तराविना

पुणे : राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाअंतर्गत सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांचे दहा दिवस दप्तरविना शिक्षण होणार आहे. या दहा दिवसांमध्ये पारंपरिक शिक्षणाच्या पलीकडे जाऊन सुतारकाम, बागकाम, मातीकाम अशी व्यावहारिक कौशल्ये, सर्वेक्षण, भेटी, सहली असे उपक्रम राबवले जाणार आहेत.

केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने या बाबतच्या मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध केल्या आहेत. त्यानुसार सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक सत्र आनंददायी करण्यासह त्यांना व्यावहारिक कौशल्ये, हस्तकौशल्ये, अनुभवाधिष्ठित शिक्षण मिळण्याच्या उद्देशाने दहा दिवस दप्तराविना असणार आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने (एनसीईआरटी) ही शिफारस केली आहे. या शिफारसीनुसार नियमित अध्यापन-अध्ययन प्रक्रियेचा भाग म्हणूनच हा उपक्रम राबवला जाणार आहे. भोपाळस्थित पीएसएस केंद्रीय व्यावसायिक शिक्षण संस्थेने काही राज्यांतील शाळांमध्ये हा उपक्रम प्रायोगिक तत्त्वावर राबवला होता. त्यातून विद्यार्थ्यांना व्यावसायिक कौशल्ये शिकण्यात रस असण्यासह दप्तराविना दिवसांचा सकारात्मक परिणाम दिसून आला. विद्यार्थी सरासरी सहा तास आणि वर्षभरातील सुमारे एक हजार तासांपेक्षा जास्त वेळ शाळेत असतात. किमान दहा दिवस किंवा साठ तास दप्तरविना दहा दिवस उपक्रमासाठी द्यायचे आहेत. विद्यार्थ्यांना वर्गाबाहेरच्या जगाचा अनुभव देण्यासाठी, दैनंदिन आयुष्यात योगदान देणारे व्यवहार समजावून देण्यासाठी आणि निरीक्षणांवर आधारित शिक्षणाची क्षमता विकसित करण्यासाठी, समाजाशी जोडलेले राहण्यासाठी दप्तराविना दिवस उपक्रम महत्त्वाचा आहे.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य समाजातील तळागाळापर्यंत पोहचले पाहिजे : पालिका अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड

कल्याण : संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे योगदान अमुल्य आहे. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य समाजातील तळागाळापर्यंत पोहचले पाहिजे, असे उद्गार महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांनी आज काढले. अण्णाभाऊ साठे यांच्या १०४व्या जयंती दिनी अखिल भारतीय मातंग समाजाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात बोलताना त्यांनी हे उद्गार गाढले.

या कार्यक्रमात व्यासपीठावर उपस्थित मान्यवरांचा अण्णाभाऊ साठे जयंती उत्सवाचे




अध्यक्ष रवि गवळी यांचे हस्ते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे लिखित माझा रशियाचा प्रवास हे पुस्तक व गुलाब पुष्प देवून सत्कार करण्यात आला.

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीदिनी महापालिका मुख्यालयात आज महापालिका अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांनी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उपआयुक्त अवधुत तावडे, विभागप्रमुख (माहिती व जनसंपर्क) संजय जाधव, माहिती व जनसंपर्क अधिकारी माधवी पोफळे, सुरक्षा अधिकारी भरत बुळे, सहा.सुरक्षा अधिकारी सुरेश पवार, इतर अधिकारी/ कर्मचारी,समाज बांधव तसेच नागरीक उपस्थित होते.


तद्नंतर लाल चौकी, कल्याण (प.) येथील साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे पुतळ्यास महापालिका अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यासमयी उपआयुक्त धैर्यशील जाधव,अवधुत तावडे, विभागप्रमुख (माहिती व जनसंपर्क) संजय जाधव,सहा. आयुक्त तुषार सोनवणे, माहिती व जनसंपर्क अधिकारी माधवी पोफळे, इतर अधिकारी /कर्मचारी, समाज बांधव व अनेक नागरीक उपस्थित होते.

# वाशीतील अतिधोकादायक इमारतींचा पाणीपुरवठा खंडित

नवी मुंबई : महानगरपालिका सी - विभाग वाशी कार्यक्षेत्रातील अतिधोकादायक इमारतींचा पाणीपुरवठा खंडित करण्याची कारवाई पालिकेने केली आहे. वाशी विभागातील जवळजवळ २५० हून अधिक घरांचा पाणीपुरवठा खंडित करण्यात आला आहे.

नवी मुंबई शहरात शहाबाज गावात घडलेल्या दुर्घटनेत ३ नागरिकांचा मृत्यू झाल्याची घटना घडल्यानंतर शहरातील बेकायदा तसेच अतिधोकादायक इमारतींचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.



वाशी विभागातील अनेक अतिधोकादायक इमारती घोषित करण्यात आल्या असताना नागरिकांनी घरे खाली केली नाहीत. तर पालिकेचेही याकडे दुर्लक्ष होत आहे. बेलापूर विभागातील दुर्घटनेनंतर पालिका आयुक्त शिंदे यांनी अतिधोकादायक इमारती तात्काळ खाली करण्याचे आदेश दिल्यामुळे विभागस्तरावर पाणीपुरवठा खंडित करण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. पाणीपुरवठा खंडित करण्यात आलेल्या इमारतींमध्ये मे. साई दर्शन को. ऑप. हौ. सो. लि. भुखंड क्र. २६ सेक्टर १४ वाशी येथील १६ सदनिकांचा पाणीपुरवठा खंडित करण्यात आला आहे.

> नवी मुंबई महापालिकेचे आयुक्त यांच्या निर्देशानुसार अतिक्रमण विभागाच्या आदेशानुसार वाशी विभागातील अतिधोकादायक इमारतींचा पाणीपुरवठा खंडित करण्याची कारवाई करण्यात येत असून सोमवारीही कारवाई करण्यात आली आहे. तसेच मंगळवारीही जवळजवळ २५० पेक्षा अधिक घरांचा पाणीपुरवठा खंडित केला आहे.
>
> – सागर मोरे,
> अतिरिक्त आयुक्त, वाशी विभाग



साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्ताने पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयात आज(१ ऑगस्ट) त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. सदर कार्यक्रमास उपायुक्त कैलास गावडे, लेखा परिक्षक निलेश नलावडे, सहाय्यक आयुक्त स्वरूप खारगे, मुख्यअग्निशमन अधिकारी प्रवीण बोडके, लेखा अधिकारी संग्राम व्होरकाटे ,आस्थापना विभाग प्रमुख नामदेव पिचड,जनसंपर्क अधिकारी वर्षा कुलकर्णी, महापालिका अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# तुर्भे, कोपरखैरणे, नेरूळ विभागात अतिक्रमण विरोधी धडक मोहीमा

तुर्भे : नवी मुंबई महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबंधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामांविरोधात नवी मुंबई महानगरपालिका अतिक्रमण विभागामार्फत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व डॉ. राहुल गेठे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने विविध विभागांत पाडकामाची कारवाई करण्यात आली. श्रावण बापू पाटील, एस वाय श्रावण पाटील, नारायण जोमा भोईर, घर नंबर.५९४.५९५.५९८ समता नगर बोणकोडे गाव कोपरखैरणे नवी मुंबई. चठढझ ५४ अन्वये नोटीस देऊन बांधकाम निष्कासित करण्यात आली. तसेच नागरी आरोग्य केंद्र, बोनकोडे, से.१२बी, येथील फुटपाथवर अनधिकृतपणे वाहन रिपेअरींग करणाऱ्यांवर कारवाई करुन सामान जप्त करण्यात आले, तसेच ४ दुचाकी वाहने डंपिंग येथे जमा करण्यात आली. बी.बी. पवार, रुम नं.७५८, नानाजी कोंडीबा गोळे, रुम नं.७५७, से.४ येथील अनधिकृतपणे उभारलेल्या पत्राशेडला कलम ५५ अन्वये नोटीस देवून सदरची शेड हटविण्यात आली. अनंत बामा ठाकूर घर क्र.१०७७ते १०८० सेक्टर २२ तुर्भे गाव नवी मुंबई. येथील अनधिकृत बांधकामावर चठढझ ५४ ची कारवाई करण्यात आली. जयेश जोमा मेहेर, घर क्र.९९, से.६, सारसोळे गांव, नेरुळ यांचे आर.सी.सी. बांधकामासाठी खोदकाम केलेले कॉलम, फुटींग भरण्याचे काम अनधिकृतरीत्या चालु होते तसेच सत्यवान रमाकांत तांडेल, घर क्र.१०२, से.६, सोरसोळे गांव, नेरुळ यांचे अनधिकृतरीत्या आर.सी.सी. फुटींगचे काम चालु असल्याने या दोन्ही अनधिकृत बांधकामांना नेरुळ विभागामार्फत चठढझ ५३ १अ अन्वये नोटीस देण्यात आली होती. त्यांनी स्वतहुन अनधिकृत बांधकाम न हटविल्यामुळे सदरची दोन्ही बांधकामे हटविण्यात आली.

या धडक मोहिमेसाठी हँडब्रेकर, गॅस कटर, जेसीबी व मजुर यांचा वापर करण्यात आलेला असून, या मोहिमेसाठी तुर्भे विभागाचे सहाय्यक आयुक्त भरत धांडे, कनिष्ठ अभियंता अमित पवार कोपरखैरणे विभागाचे सहाय्यक आयुक्त सुनील काठोळे, कनिष्ठ अभियंता सचिन नामवाड, नेरुळ विभागाचे सहाय्यक आयुक्त डॉ. अमोल पालवे, कनिष्ठ अभियंता राजु हळंदे व इतर अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.




'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर – डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई – ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम – ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक – चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१